जिथं आहे जनसामान्यांचा विश्वास....

# कृष्णाई सहकारी पतसंस्था मर्यादीत, वाई

प्रधान कार्यालय : सायली हाईटस्, ५९८/अ, गणपती आळी, वाई, जि.सातारा. ☏: (०२१६७) २२११७०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांचे पालन करून व मा. सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या परिपत्रकातील निर्देशानुसार आपले संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २५/०९/२०२१ रोजी सायं. ४ वा. ऑनलाईन पद्धतीने खालील विषयांचा विचार करणेकरिता आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी कृपया वेळेवर इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या संगणक/लॅपटॉप/स्मार्टफोन याद्वारे ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती कळावे.

## सभेपुढील विषय

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) पतसंस्थेच्या दि. ३१/०३/२०२१ अखेरच्या कार्यवृत्तांताची नोंद घेणे व दि. ३१/०३/२०२१ अखेरचा वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफातोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) सन २०२०-२१ च्या मा.वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे व सन २०१९-२० च्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
४) सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे तसेच सन २०२१-२०२२ च्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५) मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
६) सामोपचार कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सवलत दिलेल्या कर्जदारांची माहिती घेणे व त्यास मान्यता देणे.
७) सन २०२१-२०२२ करीता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
८) वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मंजूरी देणे.
९) माननीय अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : वाई
दिनांक : १५/०९/२०२१

(मा.संचालक मंडळाचे आदेशानुसार)
**श्री. श्रीकांत नारायण शिंदे**
सचिव

### ❊ टीप :-

१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ऑनलाईन पद्धतीने त्याच दिवशी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा सभेस कोरम पूर्तीचे बंधन असणार नाही.
२) पतसंस्थेच्या व्यवहारांसंबंधी काही प्रश्न अगर विधायक स्वरूपाची माहिती विचारावयाची असेल तर ती दि. २२/०९/२०२१ पूर्वी संस्थेच्या कार्यालयात लेखी पोहचेल अशी पाठवावी.
३) संस्थेची वार्षिक हिशोब पत्रके संस्थेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमध्ये कार्यालयीन वेळेत पाहणेस ठेवली आहेत.
४) संस्थेच्या उपविधीनुसार क्रियाशील सभासद होण्यासाठी संस्थेच्या व्यवसायामध्ये व कामकाजात थेट सहभाग घ्यावा.
५) सर्व सभासदांनी आपला व्हॉट्सअॅप मोबाईल क्रमांक संपूर्ण नाव व पत्यासहीत आपल्या जवळच्या शाखेमध्ये किंवा **krushnaipatsansthawai@gmail.com** या ईमेल आय.डी. वर दि.२२/०९/२०२१ पर्यंत पाठवून नोंदणी करावी.
६) मा.सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ०८/०३/२०२१ रोजी च्या परिपत्रकानुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाची प्रक्रिया होणार आहे. ऑनलाईन उपस्थितीकरिता शनिवार, दि. २५/०९/२०२१ रोजी दुपारी ३.३० वा. **kspwaiagm2021.ruha.co.in** या संकेतस्थळावर सभासदांनी कृपया लॉग इन करावे.